IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# ब्रिटिशकालीन महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षण व्यवस्था

**[1]प्रा.संगीता बोडखे, [2]प्रा.डॉ.संजीव बोडखे**

[1]इतिहास विभाग, प्रगती कला व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर

[2]इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*प्राचीन काळातील शिक्षण, ब्रिटिश सरकारने शिक्षण, समाजात आधुनिक विचार*

**ABSTRACT**

प्राचीन काळातील शिक्षण व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील कोणत्या वर्गाने शिकावे व कोणत्या वर्गाने शिकवावे याचे स्वरूप ठरलेले होते. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य वर्गातील मंडळी शिक्षण घेऊ शकत होती तर ब्राह्मण वर्गातील व्यक्ती शिकवू शकत होती. परंपरेने चालत आलेल्या शिक्षणात स्त्रियांना व शूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. इंग्रजांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांनी स्वतःची राज्यव्यवस्था टिकविण्यासाठी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्यामुळे बहुजन समाजातील लोकांना शिक्षण मिळण्यास सुरूवात झाली.

ब्रिटिश सरकारने शिक्षण प्रसारावर भर देवून महाराष्ट्रात अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. सुरूवातीच्या काळात याकामी त्यांना ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मदत मिळाली. त्यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील तरूणांची नवी पिढी पाश्चात्य संस्कृतीच्या आणि आधुनिक विचारांच्या संपर्कात आली. ब्रिटिशांच्या भौतिक सुधारणांमुळे ज्ञानाची क्षितिजे रूंदावण्यास मदत झाली. त्यामुळे येथील समाजात आधुनिक विचाराचे वारे जोराने वाहू लागले.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Bodkhe, S., & Bodkhe, S. (2025). ब्रिटिशकालीन महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षण व्यवस्था. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2078–2081.

**प्रस्तावना:**

**ब्रिटिशकालीन आधुनिक शिक्षणाची सुरुवात-**

३१ डिसेंबर १६०० रोजी इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. १६१५ मध्ये सर थॉमस रो याने मोगल बादशहा जहांगिर याच्याकडून भारतात व्यापार करण्याची परवानगी मिळविली. १७५७ च्या प्लासीच्या लढाईत विजय संपादन करून त्यांनी आपल्या सत्तेचा पाया भारतात घातला. येथून पुढे ब्रिटिशांनी भारताचा बहुतांश प्रदेश ताब्यात घेतला. जसजसा त्यांच्या सत्तेचा विस्तार होत गेला त्या प्रमाणात त्यांना प्रशासन चालविण्यासाठी भारतीयांची गरज भासू लागली. त्यातूनच त्यांनी शिक्षणाकडे लक्ष दिले. त्यामुळे बंगाल प्रांतात शिक्षणाला चालना मिळाली.

१८१३ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटने सनदी कायदा पास करून कंपनीच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशातील लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी कंपनीवर टाकली. त्यासाठी दरवर्षी एक लाख रूपये खर्च करावेत हे बंधन कंपनीवर टाकण्यात आले.[1] ही बाब भारतातील शिक्षणासाठी महत्त्वाची होती, कारण यापूर्वी कोणत्याही राज्यकर्त्यांनी शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली नव्हती. परंतु इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांनी ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर हा सनदी कायदा शिक्षणाच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरला.

लॉर्ड हेस्टिंग्जने २ ऑक्टोंबर १८१५ रोजी आपला शिक्षणविषयक खलिता प्रसिद्ध केला. त्यात त्याने भारतीयांना शिक्षण देणे हे आपले परमकर्तव्य आहे अशी भावना व्यक्त केली होती. त्यातूनच १८१५ मध्ये मुंबईत शिक्षणासाठी 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. या सोसायटीचा मुख्य उद्देश गरीब युरोपियन मुलांमध्ये शिक्षण प्रसार करणे हा होता.[2] यामुळे महाराष्ट्रातील शिक्षणाला चालना मिळाली.

१८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाला. मराठ्यांचा बराच प्रदेश प्रत्यक्ष इंग्रजांच्या ताब्यात आला. मुंबईचा पहिला गव्हर्नर म्हणून एल्फिस्टनची नेमणूक झाली. तो स्वतः शिक्षणप्रेमी असल्यामुळे शिक्षणाला चालना मिळाली. एल्फिस्टनने १८२१ मध्ये पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना केली. तर १८२२ मध्ये शिक्षण प्रसाराच्या कार्यासाठी 'बॉम्बे नेटिव्ह स्कूल व बुक सोसायटी' स्थापन केली. तिचेच पुढे १८२७ मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असे नामांतर करण्यात आले. या संस्थेने भारतीय भाषातून पाठ्यपुस्तके तयार करणे, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे इ. कामे केली. त्यामुळे मुंबई, पुणे, ठाणे व पनवेल येथे इंग्रजी शाळा तर इतर ठिकाणी मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या ११५ प्राथमिक शाळा सुरू झाल्या.[3] एल्फिस्टनच्या निवृत्तीच्या वेळी स्थानिक लोकांनी पैसा गोळा करून १८२७ साली मुंबई येथे 'एल्फिस्टन इन्स्टीट्यूट' सुरू केले. पुढे याच संस्थेचे रूपांतर 'एल्फिस्टन कॉलेज' मध्ये झाले.

१८१३ च्या सनदी कायद्यानुसार ठरलेले एक लाख रूपये कोणत्या शाळांना द्यावेत आणि शिक्षणाचे माध्यम काय असावे यासाठी गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जने १८२३ मध्ये 'कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' या समितीची स्थापना केली.[4] त्यात १० सदस्य होते. त्यातील निम्म्या सदस्यांनी प्रचलित भारतीय शिक्षण व्यवस्थेला प्रोत्साहन द्यावे असा विचार मांडला तर निम्म्या सदस्यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचे आणि इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचा आग्रह धरला. त्यामुळे समितीत वाद निर्माण झाला.

लॉर्ड विल्यम बेटिंग भारतात गव्हर्नर जनरल म्हणून आला तेव्हा हा वाद फारच चिघळला होता. अशा परिस्थितीत १८३४ मध्ये लॉर्ड मेकॉले याची गव्हर्नर जनरलच्या समितीवर विधी सदस्य म्हणून नेमणूक झाली. याचवेळी बेटिंगने त्याला कमिटी ऑफ इन्स्ट्रक्शनचा अध्यक्ष केला. त्याने भारतात ब्रिटिश सत्ता प्रबळ बनविण्याच्या दृष्टिने पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार केला. त्याला इंग्रजी शिक्षण घेतलेले भारतीय आपल्या सत्तेचे पाठीराखे होतील असे वाटत होते. त्याला वर्णाने व रक्ताने हिंदू पण आचरणाने इंग्रज हवे होते. आपली सत्ता टिकविण्याच्या कामी या लोकांचा उपयोग होईल अशी त्याची भावना होती. म्हणूनच त्याने एक लाख रूपयाची रक्कम पाश्चात्य शिक्षण व इंग्रजी माध्यमांवर खर्च करण्याचा प्रस्ताव २ फेब्रुवारी १८३५ रोजी गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलपुढे मांडला. शेवटी ७ मार्च १८३५ रोजी त्याला मान्यता देण्यात आली.[5] यामुळे भारतात इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला जाऊन पाश्चात्य शिक्षणाला सुरूवात झाली. लॉर्ड हर्डिंग्ज याने तर पुढे जाऊन इंग्रजी शिक्षण घेतलेल्या व्यक्तिलाच सरकारी नोकरीत प्राधान्य देण्याचे ठरविले. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार वाढू लागला. मुंबईत १८४० साली 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'ची स्थापना झाली.[6] तिचे १५ वर्षे काम चालू होते. शाळांची स्थापना, मान्यता, अभ्यासक्रम, फी सवलत, शाळा तपासणी, देशी भाषांना उत्तेजन, क्रमिक पुस्तके मराठी व गुजरातीतून तयार करणे या गोष्टी बोर्डाने यशस्वीपणे पार पाडल्या. या बोर्डावर जगन्नाथ शंकरशेठ व कॅप्टन

कँडी यांनी प्रभावी काम केले. त्यांनी पुणे, मुंबई, रत्नागिरी, पनवेल, ठाणे इत्यादी ठिकाणी इंग्रजी शाळा सुरू केल्या.

लॉर्ड मेकॉलेने दरम्यानच्या काळात शिक्षणातील पाझर सिद्धांत मांडला होता. त्याला असे वाटत होते की वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दिल्यास ते खालच्या वर्गापर्यंत पाझरत जाईल. मात्र शिकलेल्या लोकांनी स्वतः पूरता विचार केल्यामुळे खालच्या वर्गाला शिक्षण मिळाले नाही. शिकलेला वर्ग त्यांच्याकडे तुच्छतेने पाहू लागला. त्यामुळे दोन्ही वर्गात फार मोठी दरी निर्माण झाली. ही परिस्थिती पाहून मुंबई प्रांतात ही योजना राबविली गेली नाही. तेथे प्राथमिक शिक्षणावर जास्त भर देण्यात आला आणि काही प्रमाणात उच्च शिक्षणासाठी मुंबईत १८२४ मध्ये इंजिनिअरिंग कॉलेज, १८४५ मध्ये ग्रँट मेडिकल कॉलेज आणि पुण्यात १८५४ मध्ये सायन्स कॉलेजची स्थापना करण्यात आली.[7] या कार्यात स्थानिक लोकांनी सहभाग घेतला होता. त्यात जगन्नाथ शंकरशेठ, महरामजी मलबारी, दादाभाई नौरोजी इत्यादी अग्रेसर होते. महात्मा फुले यांनी तर या क्षेत्रात अत्यंत मोलाचे कार्य केले.

मेकॉलेचे शिक्षणविषयक धोरण अपयशी ठरल्यानंतर कंपनी सरकारने १८५४ मध्ये चार्लस वूडच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली. त्या समितीने ज्या शिफारशी केल्या त्याला वूडचा शिक्षणविषयक खलिता म्हणतात. शिक्षणाची व्याप्ती वाढविण्यासाठी व दर्जा सुधारण्यासाठी वूडने इंग्रजी व प्रादेशिक भाषांचा वापर केला जावा अशी मोलाची शिफारस केली. याशिवाय सरकारने स्वतंत्र शिक्षण खाते स्थापन करावे, इलाख्यात मुख्य शहरी विद्यापीठे स्थापन करावी, शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्था सुरू कराव्यात, सरकारी शाळेचे कामकाज आणि पैशावर नजर ठेवावी, माध्यमिक शाळा सुरू कराव्यात, भारतीयांनी सुरू केलेल्या प्राथमिक शाळांना अनुदान द्यावे, शिक्षणाचे माध्यम मातृभाषा ठेवावे, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून व उच्च शिक्षण इंग्रजीमधून दिले जावे, शिक्षणात धार्मिक अभ्यासक्रम नसावा, स्त्री शिक्षणाला सरकारने विशेष प्रोत्साहन द्यावे इत्यादी शिफारशी वूडच्या खलित्यात होत्या. त्यामुळे या खलित्यास 'मॅग्नाचार्टा' म्हटले जाते. सरकारने त्याची अंमलबजावणी करून स्वतंत्र शिक्षण खाते स्थापन केले आणि १८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास विद्यापीठांची स्थापना केली.[8] वूडच्या खलित्याने शिक्षणाचे सार्वत्रीकरण झाले. सर्वांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे ही गोष्ट मान्य झाली. भारतीयांच्या शिक्षण कार्याला सरकारी अनुदान मिळू लागले. त्यामुळे शिक्षणाच्या प्रगतीचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य-**

१८१३ च्या सनदी कायद्याने ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात येवून कार्य करण्याची परवागनी देण्यात आली. त्यामुळे अनेक मिशनरी भारतात येऊ लागले. त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली. महाराष्ट्रात 'गार्डन हॉल' याच्या नेतृत्वाखाली अमेरिकन मराठी मिशनमार्फत शिक्षण प्रसाराचे कार्य सुरू झाले. अहमदनगर हे त्यांचे मुख्य केंद्र होते. अस्पृश्य जातीतील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. १८१३ ते १८१८ या काळात त्यांनी खेतवाडी, गिरगाव येथे अनेक शाळा सुरू केल्या. १८२४ मध्ये महाराष्ट्रात पहिली मुलींची शाळा काढली. १८२९ पर्यंत मुलींच्या शाळांची संख्या ९ झाली. श्रीमती ह्यूम यांनी मुलींसाठी वसतिगृह व शाळा सुरू केल्या. डॉ. विल्सन यांनी मुंबईत मुस्लिमांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. पुढे त्यांनीच १८३५ मध्ये मुंबईला उच्च शिक्षणासाठी 'सेंट्रल कॉलेज' सुरू केले.[9] त्याचेच पुढे 'विल्सन कॉलेज' मध्ये रूपांतर झाले. खऱ्या अर्थाने ज्यांना आधुनिक शाळा म्हणता येईल त्याची स्थापना मिशनऱ्यांनी केली. अशा शाळांना 'चॅरिटी स्कूल' असे म्हटले जात असे. येथील गोरगरीब मुलांना मोफत शिक्षण देणे हा या शाळांचा उद्देश होता.

**मूल्यमापन-**

इंग्रज भारतात येण्यापूर्वी शिक्षण देणे हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे असे मानले जात नसे. मात्र १८१३ साली इंग्लंडच्या संसदेने ईस्ट इंडिया कंपनीला दरवर्षी एक लाख रूपये भारतीय शिक्षणावर खर्च करण्याचे बंधन घातले. त्याचबरोबर ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात सामाजिक व शैक्षणिक कार्य करण्याची परवानगी दिली. मिशनऱ्यांनी आपल्या कार्यास सुरूवात करून अस्पृश्य व गरीब समाजातील मुलामुलींसाठी शाळा, वसतिगृहे व दवाखाने सुरू केले. त्यामुळे भारतातील गोरगरीब मुलांच्या शिक्षणाची सोय झाली. इंग्रज व ख्रिश्चन मिशनरी यांच्या प्रयत्नातून भारतात आधुनिक शिक्षणाला चालना मिळाली. अनेक तरूण

शिक्षण घेऊन सुशिक्षित होऊ लागले. त्यामुळे नवविचारांच्या जाणिवांचे वारे भारतात वाहू लागले. शिक्षण घेऊन पुढे येणाऱ्या नव्या पिढीला अन्य भारतीयांनीही शिकावे असे वाटू लागले त्यातून पूर्वापार चालत आलेले वातावरण ढवळून निघाले.

**संदर्भ-**


1) ग्रोवर बी. एल., बेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद आणि कंपनी लिमिटेड नवी दिल्ली, 2017, पृ. 304
2) मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के. एल. पब्लिकेशन, पुणे, 2006 पृ. 283
3) वैद्य सुमन, कोठेकर शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास' (1757-1857), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती 2001, पृ.252.
4) वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (1757-1857), श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, पाचवी आवृत्ती, 2011, पृ. 257
5) कठारे अनिल, कठारे पुनम, भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2018 पृ. 120
6) मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के. एस. पब्लिकेशन, पुणे, 2006, पृ.285
7) वैद्य सुमन, कोठेकर शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास' (1757-1857), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती 2001, पृ.252.
8) सातभाई श्रीनिवास, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2008, पृ.191
9) गव्हाणे किशोर, शिंदे एस. पी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, एज्युकेशन पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद, 2014 पृ.78